**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आसाम आणि पश्चिम बंगालमधे ७ हजार ७८० कोटी रुपये खर्चाच्या विविध प्रकल्पांचा प्रारंभ

- देशाला संरक्षण उत्पादन क्षेत्रात आत्मनिर्भर बनवणं हे सरकारचं प्रमुख उद्दिष्ट असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचं नागपुरात प्रतिपादन

- भाजपाचे ज्येष्ठ नेते राज पुरोहित यांचं निधन

**आणि**

- एकदिवसीय क्रिकेट मालिकेत इंदूर इथं सुरु असलेल्या तिसऱ्या सामन्यात न्यूझीलंडचं भारतापुढं विजयासाठी ३३८ धावांचं आव्हान, भारताची खराब सुरुवात

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आसाममधे ६ हजार ९५० कोटी रुपये खर्चाच्या, तर पश्चिम बंगालमधे सिंगूर इथं ८३० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध प्रकल्पांचं भूमीपूजन आणि उद्घाटन केलं. आसामच्या काझीरंगा अभयारण्यात पोहचण्यासाठीच्या उन्नत मार्ग प्रकल्पाचं भूमीपूजन कालियाबोर इथं करताना मोदी यांनी काझीरंगा अभयारण्याचं जागतिक वारशातलं महत्त्व अधोरेखित केलं. आसामसधल्या ३ नवीन अमृत रेल्वेगाड्यांना त्यांनी हिरवा झेंडा दाखवला.

बंगालमधे बालागढ इथं हुगळी नदीवरच्या पोर्ट गेट यंत्रणेची पायाभरणी त्यांनी केली. या यंत्रणेमुळे पश्चिम बंगालमधे दळणवळणाच्या पर्यावरणस्नेही मार्गाला प्रोत्साहन मिळेल, रोजगारनिर्मिती होईल, तसंच प्रदूषणाला आळा बसेल असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला....

**होल्ड - बाईट- प्रधानमंत्री**

अंतर्गत वाहतुकीसाठी विजेवर चालणाऱ्या अत्याधुनिक कॅटामरान बोटीचं उद्घाटनही प्रधानमंत्र्यांनी केलं. बंगालमधल्या दोन नवीन रेल्वे मार्गांचं उद्घाटन त्यांनी केलं,तसंच ३ नवीन अमृत भारत एक्सप्रेस गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला. त्यानंतर प्रधानमंत्र्यांनी सिंगूर इथं जाहीर सभा घेतली. केंद्रसरकार बंगालमधल्या तरुण, शेतकरी आणि महिलांसाठी विविध कल्याणकारी योजना राबवत असून राज्यसरकार मात्र त्याच्या अंमलबजावणीत खोडा घालत असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला. विकासाकरता राजकीय मतभेद दूर सारले पाहीजेत असं ते म्हणाले.

<><><><><>

देशाला संरक्षण उत्पादन क्षेत्रात आत्मनिर्भर बनवणं हे सरकारचं प्रमुख उद्दिष्ट असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते आज नागपूर इथं वार्ताहरांशी बोलत होते. शिवा - सावंगा परिसरात स्थापन केलेल्या मीडियम कॅलिबर ऍम्युनिशन फॅसिलीटी इथं पिनाका गायडेड रॅकेटचं पहिलं उत्पादन पाठवण्यात आलं, यावेळी संरक्षण मंत्री उपस्थित होते. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखऱ बावनकुळे हेही या कार्यक्रमाला उपस्थित होते.

<><><><><>

स्वित्झर्लंडमध्ये उद्यापासून सुरु होत असलेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेत सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आज दावोस इथं पोहोचले. उद्योग मंत्री उदय सामंत आणि प्रशासनातल्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा मुख्यमंत्र्यांच्या पथकात समावेश आहे.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव, प्रल्हाद जोशी आणि के राममोहन नायडू यांच्यासह इतर केंद्रीय मंत्री परिषदेत सहभागी होतील, आणि द्विपक्षीय बैठका घेतील अशी अपेक्षा आहे. या परिषदेत कर्नाटक, उत्तर प्रदेश, केरळ आणि तेलंगणासह विविध राज्य सरकारांचे मंडप उभारण्यात आले आहेत.

दरम्यान, जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेसाठी दावोस मध्ये कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. २३ जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या परिषदेत ३ हजारापेक्षा जास्त जागतिक नेते सहभागी होणार आहेत. ‘अ स्पिरिट ऑफ डायलॉग’ ही यंदाच्या परिषदेची संकल्पना आहे.

**<><><><><>**

७७ व्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यात यंदा महाराष्ट्राचा चित्ररथ गणेशोत्सव - आत्मनिर्भरतेचं प्रतीक या संकल्पनेवर आधारित असेल. या चित्ररथातून राज्याची पंरपरा आणि अर्थव्यवस्थेचं दृष्य साकारलं जाणार आहे. युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी केंद्रसरकारच्या कार्यक्रमांची उत्कृष्ट अंमलबजावणी करणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सरपंचांना विशेष आमंत्रण आहे. जळगाव जिल्ह्यातल्या पहूरपेठ ग्रामपंचायतीचं सरपंच अब्बू तडवी यांचा त्यात समावेश असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. आकाशवाणीकडे त्यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.

**होल्ड बाईट........**

**<><><><><>**

महाराष्ट्राचे माजी मंत्री आणि ज्येष्ठ भाजपा नेते राज पुरोहित यांचं आज मुंबईत प्रकृती अस्वास्थ्यामुळे निधन झालं. ते ७१ वर्षांचे होते.

पुरोहित यांनी महाराष्ट्र विधानसभेत त्यांनी २५ वर्षं आमदार म्हणून काम केलं. १९९५ ते १९९९ दरम्यान, युती सरकारमध्ये त्यांनी कामगार, दुग्धविकास आणि संसदीय कार्य मंत्री तसंच नंतर गृहनिर्माण मंत्री म्हणूनही त्यांनी काम केलं. ते काही काळ भाजपाचे मुंबई अध्यक्षही होते.

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडनवीस, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, भाजपाचे राष्ट्रीय महासचिव **विनोद** तावडे, भाजपा नेते आणि मंत्री आशीष **शेलार** यांनी राज पुरोहित यांच्या निधनाबद्दल दुख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ इतिहाससंशोधक रामचंद्र मोरवंचीकर यांचं छत्रपती संभाजी नगर इथं प्रदीर्घ आजारानं निधन झालं. ते ८८ वर्षांचे होते. ‘प्रतिष्ठान ते पैठण’ हा त्यांचा ग्रंथ सातवाहन काळाच्या अभ्यासाकरता महत्वाचा स्त्रोत ठरला. १६ पुस्तकं आणि २०० राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शोधनिबंध त्यांनी लिहिले.

**<><><><><>**

एनटीए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं यंदाच्या जेईई (मुख्य) सत्र- १ या परीक्षेसाठीची प्रवेशपत्रकं जारी केली आहेत. या महिन्याच्या २१ ते २४ तारखेदरम्यान बी.ई. अथवा बी.टेकच्या पेपर १ साठी बसणाऱ्या उमेदवारांना एनटीएच्या अधिकृत वेबसाइट jeemain.nta.nic.in वर जाऊन त्यांचं प्रवेशपत्र डाउनलोड करता येणार आहे.

**<><><><><>**

भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी उद्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येतील. दुपारी दोन ते चार वाजेपर्यंत अर्ज भरता येतील असं पक्षाचे निवडणूक निर्णय अधिकारी के लक्ष्मण यांनी सांगितलं. दुपारी ४ ते पाच या दरम्यान अर्जांची छाननी होईल. संध्याकाळी ६ वाजेपर्यंत अर्ज मागं घेता येतील. आणि अध्यक्षपदासाठी २० जानेवारीला मतदान होईल.

**<><><><><>**

छत्तीसगडमधे बिजापूर जिल्ह्यात कालपासून सुरक्षा दलं आणि माओवाद्यांमधे सुरु असलेल्या चकमकीत मारल्या गेलेल्या माओवाद्यांची संख्या सहावर पोचली

आहे. त्यापेकी चार जणांची ओळख पटली असून त्यात नॅशनल पार्क क्षेत्र समितीचा विभागीय समिती सदस्य दिलीप बेडजा याचा समावेश आहे.

चकमकीच्या ठिकाणावरुन सहा रायफल्स सुरक्षा दलांनी हस्तगत केल्या आहेत.

दरम्यान,माओवाद्यांनी हिसाचार थांबवावा आणि विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील व्हावं, असं आवाहन छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री विजय शर्मा यांनी केलं आहे. त्यांच पुनर्वसन करुन त्यांना न्याय, सुरक्षा, आणि सन्मान दिला जाईल, अशं आश्वासनही त्यांनी दिलं आहे.

**<><><><>**

वन हक्क दावे निकाली काढावेत, या आणि इतर मागण्यांसाठी किसान सभा आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षानं नाशिक जिल्ह्यात पेठ, सुरगाणा तालुक्यात महामार्गांवर कालपासून चक्काजाम आंदोलन सुरू केलं आहे आजही हे आंदोलन सुरु असल्यानं गुजरात- महाराष्ट्र महामार्गावरची वाहतूक ठप्प झाली आहे अनेकांना धुळेमार्गे सुरतकडून गुजरातला जावं लागत आहे.

**<><><><>**

भारतापासून अंतर राखून राहणं अमेरिकेच्या हिताचं नाही, असं अमेरिकन काँग्रेस सदस्य आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाचे सदस्य रिच मॅककॉर्मिक यांनी म्हटलं आहे. ते आज ‘सेंटर फॉर स्ट्रॅटेजिक अँड इंटरनॅशनल स्टडीज’ या संस्थेनं आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. भारताप्रमाणे पाकिस्तान अमेरिकेत गुंतवणूक आणत नसल्याचं ते म्हणाले.

व्यापार आणि आयात शुल्कावरून दोन्ही देशांमध्ये निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, भारताबरोबरचे संबंध अमेरिकेसाठी आर्थिक आणि धोरणात्मक दृष्ट्या महत्वाचे असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं.

**<><><><>**

संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष शेख मोहमद बिन -झायेद -अल- नहयान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरुन उद्या भारतभेटीवर येणार आहेत.

<><><><><>

भारत-न्यूझीलंड एकदिवसीय क्रिकेट मालिकेत आज इंदूर इथं सुरु असलेल्या तिसऱ्या आणि अखेरच्या सामन्यात न्यूझीलंडनं भारतापुढं विजयासाठी ३३८ धावांचं मोठं आव्हान ठेवलं आहे.

भारतानं नाणेफेक जिंकून, न्यूझीलंडला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केलं, आणि त्यांचे पहिले दोन गडी झटपट बाद केले. त्यानंतर विल यंगही ३० धावांवर बाद झाला. मात्र डेरिल मिशेल आणि ग्लेन फिलिप्स यांनी वैयक्तिक शतकं ठोकतानाच चौथ्या गड्यासाठी २१९ धावांची भागीदारी केली. डेरिल मिशेलनं १३७, तर ग्लेन फिलिप्सनं १०६ धावा केल्या. त्यामुळे न्यूझीलंडला निर्धारित ५० षटकात ८ गडी गमावून ३३७ धावा करता आल्या.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या ३० षटकात ५ बाद १७० धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//